सिमेंट बंधा-याचे काटछेद

महाराष्ट्र शासन
**जलसंपदा विभाग**
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (दगडी धरणे)
नासिक ४२२ ००४
क्रमांक सीडीओ/साठवण बंधारा/(०७०५)/(७३/२००५)/दध-१/२३७
दिनांक : २८ जुलै २००५

पहावे :- १) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र.रोहयो-२००३/प्र.क्र.१३९/रोहयो-६, दिनांक २ जानेवारी, २००४
२) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र.रोहयो-२००३/प्र.क्र.१३९/रोहयो-६, दिनांक १४ मे, २००४
३) शासन, नियोजन विभाग अर्ध शासकीय पत्र क्र.रोहयो-२००४/प्र.क्र.१८८/रोहयो-६, दिनांक ३ सप्टेंबर, २००४

**परिपत्रक**

पाणलोट क्षेत्र विकासाचे परिणामकारक उपचार म्हणून राज्याच्या वेगवेगळया विभागांमार्फत (जलसंपदा/जलसंधारण/कृषी व जिल्हा परिषद) आणि वेगवेगळया योजनांर्तगत (रोहयो (EGS)/ संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY)इत्यादि) १) पाझर तलाव, २) गाव तलाव, ३) वन तलाव, ४) बोडी, ५) माती नाला बांध, ६) सिमेंट बंधा-याची कामे मोठया प्रमाणावर केली जातात.

२. शासन परिपत्रक संदर्भ क्र.१ अन्वये क्र.१ ते ५ च्या वरील कामात सुसूत्रता व सारखेपणा आणण्यासाठी सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासन परिपत्रक संदर्भ क्र.२ अन्वये या तलावासाठी बांधावयाच्या पक्षभिंतींचा (Flank Walls) आणि सांडवाभिंतींचा (Spillway) ६ मीटर पर्यंत उंचीच्या काटछेदांचा तांत्रिक तपशील देणा-या सूचना पण वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

३. शासनाने संदर्भातील पत्र क्र. ३ नुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (दगडी धरण) यांना **सिमेंट बंधारा** (weir) या पाणलोट क्षेत्र विकासाच्या एका महत्वाच्या घटकाच्या (क्रमांक ६) वेगवेगळया उंचीसाठी तांत्रिक तपशील देणारे काटछेद तयार करुन पाठविण्यासंबंधी सूचित केले होते.

४. याला अनुसूरुन या उपचाराच्या बांधकामामध्ये पण एकसूत्रिपणा व सारखेपणा आणण्यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (दगडी धरण) यांनी १.५, २, २.५ आणि 3 मीटर